
माल्कम एक्स


लेखिका: जेसिका गंडरसन; चित्रे: सेटू हेडन

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन




प्रवास
जेद्दा, सौदी अरब, 1964
एप्रिल 1964 मध्ये, कृष्णवर्णीय मानवाधिकार नेता *माल्कम X* सौदी अरबमध्ये गेले. मुस्लिमधर्मीय असल्यामुळे त्यांना आयुष्यात एकदातरी मक्केची यात्रा करावी, असे वाटत होते.
हा प्रवास कदाचित माझं आयुष्यच बदलून टाकेल.
अमेरिकेतून आलाय? संशयास्पद दिसतोय.
मी मुस्लिम आहे! मी माल्कम X आहे! तुम्ही ओळखत नाही का मला?
माझ्यासोबत या, सर.
मी आयुष्यात बराच संघर्ष केलाय....
पण कुणी मला अद्याप रोखू शकलेलं नाही!
माल्कमला येणाऱ्या संकटाची कल्पना नव्हती. नऊ महिन्यांनी त्याच्या न्यूयॉर्कमधील घरावर बाँब टाकण्यात आला.


न्यूयॉर्क, फेब्रुवारी 14, 1965
माल्कम X, कोणी तुम्हाला मारण्याचं कारस्थान करू शकतं का?
हो, आहेत काही लोक असे.




जेद्दा, सौदी अरब, 1964
तुम्हाला बोलावणं येईपर्यंत इथेच थांबा.
या खोलीत वेगवेगळ्या जातींचे, वंशांचे लोक एकत्र आहेत.
हे सगळे एकाच भांड्यातून खातायत! अमेरिकेत काळे आणि गोरे लोक कधीच एका भांड्यातून खात नाहीत.
काही खाणार?
नाही, आभार. मी प्रार्थना करतो.



ईश्वराचा विजय असो. तो सर्वाधीश आहे.
मला प्रार्थना करायची नेमकी पद्धत अजून ठाऊक नाही.
आणि मी मुस्लिम म्हणतो स्वत:ला. बराच काळ तुरुंगात राहिलोय मी.



चार्ल्स टाऊन तुरुंग, 1946
माल्कम 20 वर्षांचा होता तेव्हा त्याला चोरीच्या आरोपाखाली तुरुंगात टाकले होते. त्यावेळी त्याचं नाव *माल्कम लिटल* होते.
मी काळा असल्यामुळे तुरुंगात आहे, *बिंबी*.
काय बोलतोयस माल्कम?
हाच गुन्हा करणाऱ्या गोऱ्या लोकांना तुरुंगात नाही पाठवत.
तू अडाणी आहेस म्हणून इथे आहेस. इथे तुला सुधारण्याची संधी आहे.
तुरुंगातील वेळेचा सदुपयोग कर. आपला मेंदू वापर. जमेल तितकं वाचन कर.
माल्कमने बिंबीचा सल्ला मानला. त्याने मिळेल ती पुस्तकं वाचली. तो तुरुंगातील शाळेतही जाऊ लागला.
तुरुंगातील शिक्षणाने माल्कमचे आयुष्य बदलून टाकले. भाऊ रेजिनाल्डच्या मदतीने त्याने इस्लाम धर्माचे ज्ञान मिळवले. त्याला *नेशन ऑफ इस्लाम* या कृष्णवर्णीय लोकांच्या संघटनेबद्दलही कळले.
तू एलिझा मुहम्मदला पत्र लिही.
तो नेशन ऑफ इस्लामचा सदस्य आहे.
तो म्हणतो की गोरे लोक दुष्ट असतात.


त्याकाळी, गोरे लोक वापरत ते बाथरूम वा शॉवर काळे लोक वापरू शकत नसत. बसमध्ये त्यांना मागे बसावे लागे आणि वेगळ्या शाळेत जावे लागे. काही लोकांना वाटे की काळे आणि गोरे लोक यांना समान वागणूक द्यायला हवी. पण एलिझाच्या मते, काळ्या लोकांनी स्वत:ची संघटना बांधावी. माल्कम तुरुंगातील आपल्या सहकाऱ्यांना एलिझाच्या कल्पनेबद्दल बोलला.
गोऱ्या लोकांनी आपलं खच्चीकरण केलंय!
गोऱ्या लोकांनी आपल्याला गरीब बनवून ठेवलंय!
गोऱ्या लोकांनी आपल्याला कैद करून ठेवलंय!
आपण स्वत:ची संघटना बनवायला हवी.
आपण एलिझा मुहम्मद आणि *नेशन ऑफ इस्लाम*चं पालन करायला हवं.
खरं बोलतोयस तू भाऊ!


एलिझा मुहम्मदशी भेट
1946 साली तुरुंगात धाडण्यात आले तेव्हा माल्कम तरूण आणि अशिक्षित होता. सहा वर्षांनी, तो शिक्षित आणि कल्पक माणूस बनून बाहेर आला.
तू आता मुक्त आहेस.
स्वातंत्र्य?
एका काळ्या माणसासाठी अशा स्वातंत्र्याला काही अर्थ नाही.
माल्कमने एलिझा मुहम्मदला शोधून काढले. तो नेशन ऑफ इस्लाममध्ये सामील झाला.
आता तू माल्कम X म्हणून ओळखला जाशील.
तुझं लिटल हे आडनाव गुलामांच्या गोऱ्या मालकांनी तुझ्या गुलाम पूर्वजांना दिलं होतं. ते आता वापरू नकोस.
X हे तुझं अज्ञात आफ्रिकी आडनाव आहे.



आम्ही इथे भेटतो. इथे डेट्रॉईटमध्ये, आपले काही डझन सदस्य आहेत.
एवढे कमी? सदस्यांची भरती करण्यासाठी मी काही मदत करू?
तुरुंगातील काही लोक माझे सल्ले ऐकत. ते इथेसुद्धा ऐकतील माझं.
तू उत्कट आहेस, माल्कम. तू बोलतोसही मधाळ. तू चांगला वक्ता बनू शकतोस.



पुढली अनेक वर्षे, माल्कम एलिझा मुहम्मद यांच्या विचारांचा प्रसार करत देशभर फिरले. गोरे लोक जाणूनबुझून काळ्या लोकांना पुढे येण्यास रोखतात, असे *नेशन ऑफ इस्लाम* ठासून सांगत असे.
गोरे लोक आपले शत्रू आहेत.
काय आपण आपल्या शत्रुशी हातमिळवणी करायची?
नाही!
मी आपल्या बांधवांना काही सल्ला देऊ इच्छितो.
दारू, सिगारेट, नशा यांच्यापासून दूर राहा. शिका, सुशिक्षित बना.
शिक्षणाशिवाय, तुम्ही जगात मानाने राहू शकत नाही.


LENOX PHARMACY
काही करून आपल्याला स्वातंत्र्य मिळवायचं आहे.
काही करून आपल्याला न्याय मिळवायचा आहे.
काही करून आपल्याला समानता मिळवायची आहे.
1952 साली, नेशन ऑफ इस्लामचे फक्त 4,000 सदस्य होते. माल्कमच्या अथक प्रयत्नांमुळे 1963 साली ही संख्या 4,00,000 इतकी झाली.



जेद्दा, सौदी अरब, 1964
सुदैवाने, माल्कमकडे जेद्दातील एका प्रतिष्ठीत व्यक्तिचा फोन नंबर होता. डॉ. ओमर आझम, माल्कमच्या मदतीसाठी तात्काळ विमानतळावर पोहोचले.
तुम्ही ज्यांना ताब्यात घेतलंय, ते माल्कम X आहेत.
ते अमेरिकेतील प्रसिद्ध व्यक्ती आहेत. त्यांना माझ्यासोबत नेतो मी.
माफ करा, डॉ. आझम. आम्ही त्यांना सोडून देतो.



तुम्ही मक्केला जाईपर्यंत माझे पाहुणे आहात.
मी तुमचे आभार कसे मानू!



माझ्या आयुष्यात कधी एका गोऱ्या माणसाने माझ्याशी एवढं चांगलं वर्तन केलं नव्हतं.
WHITE DEVILS
एवढी वर्ष मी हेच समजून चाललो की गोरे आमचे शत्रू आहेत.
माझं चुकलं होतं का?
The Times
THE ANGRIEST NEGRO IN AMERICA?
Malcolm X and the Black Muslims


हिंसेशिवाय
क्रांती
माझ्या सभोवती शांतता जाणवतेय.
मक्का, सौदी अरब, 1964
पूर्वी मला शांततेचा तिरस्कार वाटायचा.


1963 च्या सुमारास
नागरी हक्क नेता *डॉ. मार्टीन ल्यूथर किंग*बद्दल तुम्हाला काय वाटतं?
डॉ. किंग हे अहिंसक क्रांतीवर विश्वास ठेवतात. पण मी विचारतो की हिंसेशिवाय क्रांती होऊच कशी शकते?
डेट्रॉईट, नोव्हेंबर 1963
क्रांती रक्तरंजित असते, क्रांती शासनविरोधी असते, क्रांतीला तडजोड माहीत नसते. क्रांती आपल्या वाटेत येणारं सगळं काही नष्ट करते.



1963 पर्यंत, एलिझा आणि माल्कम यांच्यातील मतभेद वाढले. माल्कमला एलिझाचे कट्टर विचार जाचक वाटू लागले.
दरम्यान, माल्कमची लोकप्रियता वाढू लागल्यावर एलिझाला संशयाने पछाडले.
तुम्ही तुमची जहाल भाषा मवाळ करायला हवी.
मी असंख्य लोकांना नेशन ऑफ इस्लाममध्ये आणलं. आणि आता तू मला थांबायला सांगतोयस?
मग माल्कमला कळलं की एलिझा आपल्या पत्नीशी एकनिष्ठ नव्हता. दुसऱ्या एका स्त्रीपासून तो सात मुलांचा पिता बनला होता.
एलिझा विश्वास आणि लग्नाबद्दल भाषणं देतो. पण तो दांभिक आहे! तो आणखी काय काय करत असेल?
आता मला एलिझाचा आदर वाटत नाही.



डिसेंबर 1, 1963
लवकरच, माल्कम आणि एलिझा यांच्यातील दरी आणखी वाढली. राष्ट्राध्यक्ष *जॉन एफ़. केनेडी* यांची हत्या झाली तेव्हा एलिझाने माल्कमला त्याबद्दल काहीही न बोलण्याची सूचना दिली.
केनेडीच्या हत्येने गोऱ्यांचा तिरस्कार उघड केला आहे. पण हा तिरस्कार आता त्यांचंच नुकसान करणार आहे.
लोकांना वाटले की माल्कमच्या मते केनेडी मरायच्याच लायकीचा होता. नंतर माल्कमने आपले स्पष्टीकरण दिले की त्याचे मत होते की हिंसेने हिंसा वाढते. पण एलिझावर त्याचा परिणाम झाला नाही.
SUN-TIMES
STATEMENT BY MALCOLM X STIRS FUROR
तू माझी आज्ञा पाळली नाहीस.
तुला नेशन ऑफ इस्लाममधून 90 दिवसांसाठी निलंबित करण्यात येत आहे.
मी संघटनेसाठी कठोर मेहनत घेतली आणि तुम्ही मला काढून टाकताय?
माल्कम पुन्हा कधीही नेशन ऑफ इस्लाममध्ये परतला नाही.
माल्कमने स्वत:च्या *मुस्लिम मशीद* आणि नंतर *आफ्रो अमेरिकी एकता* या संघटना बनवल्या..


मक्का, 1964
नेशन ऑफ इस्लामने मला निलंबित केलंय.
पण खऱ्या इस्लाम धर्माने माझा स्वीकार केलाय.
जगभरातील सर्व जातींचे, रंगांचे लोक....
....एकवटत आहेत.
यामुळे ईश्वराच्या शक्तिबद्दल माझी खात्री पटलीय.


माझी इच्छा आहे की अमेरिकी लोकांनी एक होऊन जगायला शिकावं........
....ते नेहमी एकमेकांच्या विरुद्ध लढत असतात.
माल्कमने आपल्या कुटुंबाला आणि मित्रांना मक्केतील आपल्या अनुभवांबद्दल लिहिले. त्याने मुस्लिम मशीदलाही पत्र लिहून ते प्रकाशित करण्यास सांगितले.
याने अमेरिकी लोकांना धक्का बसेल. त्यांच्यासाठी तिरस्कार आणि मी समान आहेत.
what I have seen has forced me to toss aside my previous conclusion


अमेरिकेला परतल्यावर माल्कम आपल्या नव्या विचारांचा प्रचार-प्रसार करू लागला.
नुकत्याच केलेल्या दौऱ्यांमध्ये मला जाणवलं की सर्व लोकांमध्ये – मग ते काळे असोत वा गोरे – एकता असायला हवी.
प्रत्येकाला मानवी हक्क असावेत, यावर माझी श्रद्धा आहे.
कुणी कुणाचा तिरस्कार करू नये.
मी वर्णभेद आणि वंशभेदाच्या विरुद्ध आहे.
माझी श्रद्धा माणसावर आहे. रंग, वर्ण यांची पर्वा न करता संपूर्ण मानजातीचा आपण आदर करायला हवा.


एलिझा मुहम्मदने त्याच्या अनुयायांची दिशाभूल केली होती, हे माल्कम विसरला नव्हता.
आखाती देशांमध्ये मला खरा इस्लाम धर्म सापडला.
तिथे एलिझा मुहम्मद पुरस्कृत करतात तसा वर्णभेद दिसला नाही.
गोरे लोक दुष्ट असतात, ही श्रद्धा बाळगल्यामुळे परिस्थिती आणखी चिघळेल.
एलिझा मुहम्मदने आपल्या पत्नीला धोका दिला. तो आपल्या शिष्यांशी खोटं बोलला.


माल्कम मोठा माणूस बनलाय.
त्याला मी मोठा केला.
आम्ही त्याचा बंदोबस्त करू का?
तो स्वत:चा सर्वनाश करत आहे.
पण माल्कमच्या नव्या विचारांमुळेही धोका निर्माण झाला होता. कित्येक गोऱ्या आणि काळ्या लोकांना त्याचे समानतेचे आणि एकतेचे विचार पटत नव्हते.
माझ्या नव्या विचारांची फळं पाहायला मी कदाचित जिवंत नसेन.


माल्कमला जाणवलं की त्याचा जीव धोक्यात आहे. लवकरच त्याला जीवे मारण्याच्या धमक्या मिळू लागल्या.
काल रात्री मला आणखी एक धमकी मिळाली.
याच्या मागे नेशन ऑफ इस्लामचे लोक आहेत.
माल्कम, आता काय करायचं?
हे कसं वापरायचं, ते शिकून घे.
कदाचित गरज लागेल त्याची....
घरावर बॉंब पडला तेव्हा माल्कमला कळून चुकले की तो आता मृत्यूच्या समीप आहे.
मला साऱ्या कुटुंबाला संकटात टाकायचं नाहीये.
पण मी माझे विचारही सोडू शकत नाही.
नको सोडूस. माल्कम, तू लाखो लोकांना आत्मविश्वासाने आणि स्वाभिमानाने जगायला शिकवलंयस.


फेब्रुवारी 21, 1965
बॉंबफेकीनंतर एका आठवड्याने, माल्कमला न्यूयॉर्कमधील *ऑडुबॉन* नृत्यशाळेत भाषण करायला बोलावण्यात आले.
मी माल्कम X यांना इथे आमंत्रित करतो.
तुम्हाला शांतता लाभो.
माझ्या खिशातला तुझा हात बाहेर काढ.
शांत व्हा, बंधुंनो.
श्रोत्यांमध्ये खळबळ माजली. शत्रू याच संधीची वाट पाहात होते.
तीन बंदुकधारी माणसांनी माल्कमवर 16 गोळ्यांचा वर्षाव केला.


AUDUBON BALLROOM
पकडा त्याला. त्याने माल्कम X ला गोळ्या घातल्या.
माल्कम X च्या हत्येसाठी नेशन ऑफ इस्लामच्या तीन सदस्यांना अटक झाली. दोघांनी निर्दोष असल्याचे सांगितले, पण तिघांनाही शिक्षा सुनावण्यात आली.
या हत्येत सहभाग असल्याचे एलिझा मुहम्मदने नाकारले.
हत्येबद्दल....
मी आधीच सांगितलंय, माझा काहीही संबंध नाही.
जगभरातील लोकांनी माल्कम X ना श्रद्धांजली वाहिली. प्रसिद्ध अभिनेते *ऑस्सी डेव्हीस* माल्कमच्या अंतिम संस्कारप्रसंगी दोन शब्द बोलले.
तो आपला काळा तेजस्वी राजपुत्र होता. तो मरणाला भीत नव्हता, कारण त्याचं आमच्यावर प्रेम होतं.
येणाऱ्या कित्येक वर्षांत माल्कमच्या विचारांचे स्मरण केले जाईल.



माल्कम X विषयी आणखी माहिती

लोकांनी त्यांना काळा दहशतवादी म्हटले असले तरी माल्कम X यांचे व्यक्तिमत्व आकर्षक होते. ते नेहमी प्रसन्न असत, लोकांना हसवत. त्यांचे भाषण शिक्षित, अडाणी, तरूण, वृद्ध अशा सर्वांनाच समजत असे.

माल्कमचे बालपण खडतर गेले. तो सहा वर्षांचा असताना त्याचे वडील एका कार अपघातात निधन पावले. काही लोकांनुसार, त्यांना गोऱ्या वर्णभेदी लोकांनी मारले आणि रेल्वेरुळावर टाकले. माल्कम 13 वर्षांचा झाल्यावर, त्याच्या आईला मानसिक रुग्णालयात भरती करण्यात आले. माल्कम आणि त्याच्या दहा भावंडांना वेगवेगळ्या अनाथालयात पाठवण्यात आले. आठवीनंतर माल्कमने शाळा सोडली आणि तो गुन्हेगारी विश्वात शिरला.

तुरुंगवासानंतरही, माल्कमने इतिहास, धर्म आणि तत्वज्ञान या विषयांच्या पुस्तकांचे वाचन सुरू ठेवले. तो रात्री फक्त चार तास झोपत असे. त्याला आशा होती की कृष्णवर्णीय समाज त्याचे उदाहरण पाहून प्रेरणा घेईल आणि शिक्षित होईल. तो म्हणतो, “शिक्षण हे भविष्याचे पारपत्र आहे. उद्याचा भविष्यकाळ त्यांचा असणार आहे, जे आजच त्यात गुंतवणूक करतील.”

पत्नी आणि कुटुंबियांनी माल्कमच्या मृत्युनंतर त्याच्या विचारांचा प्रचार-प्रसार सुरू ठेवला. 1960 च्या दशकात नागरी हक्क चळवळ सुरू राहिली. त्यामुळे आफ्रिकी-अमेरिकींना त्यांच्या कार्यालयात आणि समाजात समानता मिळण्यात मदत झाली. वर्णभेदाविरुद्ध हा संघर्ष आजही सुरू आहे.

माल्कम X ने आफ्रिकी-अमेरिकींच्या संघर्षाला आवाज दिला. वंश, समानता आणि एकता या आपल्या विचारांवर पूर्णपणे कार्यवाही करण्याआधीच माल्कम यांचा मृत्यू झाला. मानवी हक्कांच्या संघर्षात माल्कम X यांनी एक महत्त्वाची भूमिका निभावली आणि आपल्यासाठी ते एक शाश्वत वारसा मागे सोडून गेले.

माझा लोकांवर विश्वास आहे, लोकांनी वर्णाची पर्वा न करता एकमेकांचा आदर करायला हवा यांवर विश्वास आहे.

- माल्कम X

